Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
दुरध्वनी: (ईपीएबीएक्स) 2609000, www.unishivaji.ac.in
Department of Sports. Phone No.- 0231-2609266
Email id: sports@unishivaji.ac.in

संदर्भ क्र.: क्रीडा/होजिअरी/२०२६–२७/5383 दि. १६/११/२०२६

प्रथम मुदतवाढ

प्रति,
संबंधित पुरवठाधारक,

महोदय,

क्रीडा अधिविभागाकरिता सन २०२६-२७ मध्ये होणा-या पश्चिम विभागीय, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ, क्रीडा महोत्सव शिवाजी विद्यापीठ या स्पर्धेकरिता विद्यापीठाचे विविध खेळांचे विद्यार्थी खेळाडूंचे संघ पाठविले जातात. या स्पर्धेतील खेळाडू, प्रशिक्षक व संघव्यवस्थापक यांना टी शर्टस, शॉर्टस, बनियन, स्कर्टस, स्टॉकींग, कॉस्टूम, कॅप किंवा हॅट, फुलजर्शी व ट्रॅकसुट इ. खेळ प्रकारानुसार होजिअरी किट द्यावे लागते. खेळाडूंना होजिअरी (किट/गणवेश) तयार करुन घ्यावयाची आहेत. तरी संबंधित पुरवठाधारकांनी खालीलप्रमाणे दरपत्रक (कोटेशन) बंद लिफाफयातून नोंदणीकृत (GST प्रमाणपत्र असलेल्या) पुरवठाधारकांनी विद्यापीठ कार्यालयात मा.वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे दि.२०.११.२०२६ रोजी पर्यंत कार्यालयात पोहचतील अशा रितीने समक्ष अथवा पोष्टाने पाठवावीत. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. क्रीडा विभागास होजिअरी करिता खालीलप्रमाणे वर्णन (Specifications) व नग संख्या आवश्यक आहेत.

The Chart Showing Sports Hosiery Demand for the Year 2026-27				Rates inclusive all taxes, GST etc
Sr. No.	**Name of Hosiery**	**Qty Required**	**Specification**	
1	T-Shirt for Player	230	Cloth Dry Fit/Advance180gsm to 200gsm As per size front logo Back Side Name Numbers	
2	Short	230	Dry Fit / Advance with pocket/chain gsm 180 to 200 gsm 1 ½ inch elastic	
3	Track-Suit	230	Four Way Lycra 250 to 280 gsm Taiwan 4way Lycra 250 to 280 gsm pant 2 pocket with ykk zip elastic 1 ½ inch Jacket – ykk zip 2 pocket frontside Backside Name	
4	T-Shirt for Coach/ Manager	20	220 gsm cotton meti / Polo meti front side logo Back side Name	

क्रीडा अधिविभाग, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ,

16/11/26
Director
Sports & Physical Education
Shivaji University, Kolhapur

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
दुरध्वनीः (ईपीएबीएक्स) 2609000, www.unishivaji.ac.in
Department of Sports. Phone No.- 0231-2609266
Email id: sports@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र.: क्रीडा/होजिअरी/२०२६—२७/ दि. १६/११/२०२६

अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१. होजिअरी साहित्यांचा पुरवठा वरील नमुन्याप्रमाणे करावयाचा आहे.

२. नमुन्याप्रमाणे नसलेले नग पुन्हा वेळेत तयार करुन द्यावे लागतील व त्यासाठी वेगळा आकार दिला जाणार नाही.

३. ऑर्डर पोटी ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.

४. ज्या पुरवठादाराचे दर मान्य केले आहेत त्यांना एकूण खरेदी रक्कमेच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कार्यालयात रोखीने भरावी लागेल.

५. बिल दोन प्रतीत मा.वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीटसह द्यावे लागेल.

६. दरपत्रके स्वीकृत झाली आहेत असे पुरवठाधारकास कळविल्यानंतर दरपत्रकांमधील अटी व शर्तीचा अंतर्भाव असलेल्या हमीपत्राचा मसुदा विद्यापीठाकडून पाठविला जाईल व ते हमी पत्र आवश्यक त्या मंजूर दिनांक व सही शिक्क्यासह ०५ दिवसांत विद्यापीठाकडे परत करावयाचा आहे. विहीत मुदतीत करारनामा करुन न दिल्यास बयाणा रक्कम जप्त करुन दुस-या निविदाधारकाकडून पुरवठयाची प्रक्रिया सुरु केली जाईल.

७. देयकाची १०० टक्के रक्कम सर्व पुरवठा झाल्यानंतर वस्तू आवश्यकतेप्रमाणे असलेबाबत खात्री करुन आदा केली जाईल.

८. पुरवठाधारकाला आदा केल्या जाणा-या देयकांच्या रक्कमेमधून प्रचलित दरानुसार (शासनास देय असलेली) कराची रक्कम वजा केली जाईल.

९. पुरवठाधारकाकडून हमीपत्रात नमूद केलेल्या वस्तूचा पुरवठा वेळेत न झाल्यास विद्यापीठास करारातील हक्क अबाधीत ठेवून नुकसान भरपाई (दंडाची रक्कम) खालीलप्रमाणे वसुल करता येईल.

१०. उशिरा पुरवठा केलेल्या वस्तूंच्या मालाच्या किंमतीवर ०.५ टक्के प्रति आठवडयाप्रमाणे दंड आकारणी केली जाईल व जास्तीत जास्त ५ टक्के दंड आकारला जाईल.

११. दरपत्रकासोबत १.जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र २. संस्था नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. ३. पुरवठाधारकांची यादी

१२. वस्तुचा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांमध्ये करावयाचा आहे.

१३. कमी अगर जास्त दराचे दरपत्रक अथवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा अगर स्वीकारण्याचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवला आहे.

क्रीडा अधिविभाग, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ

16/11/26
Director
Sports & Physical Education
Shivaji University, Kolhapur